Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

**परीक्षा महत्वाचे**

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 979
दिनांक :- 24/06/2024

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय** :- **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी ) पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट 2024 विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत..**

**संदर्भ** :- क्र.रा.म./परीक्षा-8/2456 दि.21/6/2023

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम 1977 नियम क्र.93 अन्वये जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.17/06/2024 रोजी समाप्त झालेली आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारित मुदत संपल्यानंतर अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशिलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.50/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.100/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.200/-प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) |
|---|---|---|---|
| इ.10 वी व इ.12 वी परीक्षा | सोमवार दिनांक 24/06/2024 ते सोमवार दिनांक 01/07/2024 | मंगळवार दिनांक 02/07/2024 ते सोमवार दिनांक 08/07/2024 | मंगळवार दिनांक 09/07/2024 ते सोमवार दिनांक 15/07/2024 |

सदर आवेदनपत्र कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व प्राचार्य / मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह सोबतच्या विहित परिशिष्ट (अ) नुसार आवश्यक कागदपत्रासह आवेदनपत्राची Print Out, एक्सेल यादी, फी डिटेल्स आणि पुनर्परिक्षार्थी/ श्रेणीसुधार अंतर्गत प्रविष्ठ / तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ विद्यार्थ्यांची मागील परीक्षांच्या गुणपत्रिकांच्या प्रती मंडळ कार्यालयात **हस्तपोहोच** सादर करावे.

आवेदनपत्र विभागीय मंडळात जमा करण्याच्या दिवसापर्यंतचे अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्क भरणे आवश्यक आहे. **सदर शुल्क मंडळाकडे प्राप्त झाल्यानंतरच अर्ज ग्राहय धरण्यात येईल**.

प्रस्तावा सोबत अशा विद्यार्थ्यांने विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षाकेंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेऊन ते मंडळास प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

मा.अध्यक्ष, राज्य मंडळ यांच्या मंजूरीशिवाय विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही त्यामुळे वरील सर्व कागदपत्रे मंडळास कोल्हापूर विभागीय कार्यालयात हस्तपोहच सादर करण्याची जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालय/ विद्यार्थी यांची राहील. कोणत्याही परिस्थितीत सदर कागदपत्रे पोस्टाने/ कुरिअरने पाठविण्यात येऊ नयेत. मा.अध्यक्ष, राज्य मंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अपूर्ण कागदपत्रे प्रस्ताव/ कमी परीक्षा शुल्क/ विशेष दंड मुदतीत मंडळास सादर न केल्यास विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच **कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी**.

(सुभाष रा.चौगुले)
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबत- विहीत परिशिष्ट (अ) नमुना.**

१०५

# परिशिष्ट-अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नाव: ------------------------------

विभागीय मंडळाचे नाव: ----------- विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांक: ------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाह्य आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ------------------------------------------------
२) शाळेचे नाव व पत्ता : ------------------------------------------------
३) शाळेचा सांकेतांक क्रमांक : ------------------------------------------------
------------------------------------------------
४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.
अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार
ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन
क ( ) नैसर्गिक आपत्ती
ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.
१. ------------------------- २. -------------------------
३. ------------------------- ४. -------------------------
५. ------------------------------------------------

६) शाळा प्रमुखांची शिफारस :-
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला - रोख/ चलन क्रमांक ------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ------------------------------------
------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का

## परिशिष्ट–अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

(१८७)

परीक्षेचे नावः ------------------------------

विभागीय मंडळाचे नावः ----------- विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः ------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

### इ.१२ वी

१) विद्यार्थ्यांचे नाव : ----------------------------------------------------

२) क. म. वि. नाव व पत्ता : --------------------------------------------

३) क. म. वि. सांकेतिक क्रमांक : ----------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार — ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती — ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार — ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती — ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

६) कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची शिफारस :-

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का**

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला – रोख/ चलन क्रमांक ------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस -------------------------------------

-------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ९३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

**विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,**
**विभागीय मंडळाचे नाव व शिक्का**